आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

June 2017, Issue-30, Vol-01

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

Co-Editor
Dr. Ravindranath Kewat
(M.A. Ph.D.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

❖ Editorial Board ❖

1) Dr. Vikas Sudam Padalkar , Japan
2) M.Saleem, Sialkot , Pakistan
3) Dr. Upadhya Bharat (Sangali)
4) Dr. Vinita Basantani , Pune
5) Prof.Surwade Yogesh , Satara
6) Dr. Pankaj Kumar U.P
7) Prof. Ganesh Khandare,Mangrulpir
8) Dr. Wankhede Umakant , M.S.
9) Dr. Viplav, U.P
10) Manoj kumar Singh , New Delhi
11) Dr. Falguni C. Shastri , Gujrat
12) Dr. Nilendra Lokhande (Mumbai)
13) A. Durga Prasad, Telangana
14) Prof. Ramakant Choudhari, Dhule
15) Dr. Neeraj Shukla (UK)

❖ Advisory Committee ❖

1) Dr. Yerande V. L.., Nilanga
2) Dr. Yallawad Rajkumar , Parli v.
3) Dr. Durga Kant Chaudhary, U.K.
4) Dr. Shinde Sunil , Parbhani
5) Dr. Awasthi Sudarshan , Parli v.
6) Dr. Rajeshchandra Pandey, U.P.
7) Mr.M.Muthu , Chennai
8) Dr. Rakhi Tyagi, (Meerut) U.P.
9) Archana Mankar, Nashik
10) Dr. Chodhari N.D. , Kada
11) Shatrughan Jha, Haridwar
12) Dr. Sarad Kumar Mishara, U.P.
13) MD. Shahbaz Khan, Bhagalpur
14) Dr. Deepak Patil,Dhule
15) Dr.Umeshchandra Shukl

UGC Approved Journal
ज्ञान-विज्ञान विमुक्तये
UGC
Sr.No.7912 & 8431

IMPACT 4.002 iijif FACTOR




Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 3418002

**Note :** The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. 'Printing Area' dose not take any libility regarding appoval/disapproval by any university,institute,academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Vidyawarta is not necessary. Disputes, If any shall be decided by the court at **Beed** (Maharashtra, India)

http://www.printingarea.blogspot.com

14) आधुनिक मराठी प्रसारमाध्यमांतील भाषा
**डॉ. प्रमोद गंगाधर आंबेकर, जि. नाशिक** || 73

15) राजर्षी शाहू यांचे अस्पृश्य विषयक विचार
**सचिन गुंडीराम डेंगळे, नांदेड** || 76

16) संत एकनाथ: मध्यअयुगीन मराठी साहित्यिक व धर्मरक्षणकर्ता
**डॉ. चव्हाण बाळासाहेब संतू, कोरेगाव** || 78

17) वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या व मुलांच्या समस्या
**कैलाश व्ही. बिसांद्रे** || 83

18) मध्ययुगीन महाराष्ट्रातील उद्योगधंदे एक ऐतिहासिक आढावा (कोकण प्रदेशाच्या संदर्भात)
**प्रा. अरूण अवचितराव पाटील, जळगाव, प्रा. डॉ. रमेश डी. जाधव, शिरपूर** || 88

19) महाराष्ट्रातील इंदिरा आवास योजना : एक अभ्यास
**प्रा. जोशी राजकुमार लक्ष्मीकांत, प्रा. डॉ. देशमुख महेश प्रभाकर, जि. बीड** || 90

20) स्वामी विवेकानंदाचे शैक्षणिक विचार – एक ऐतिहासिक सिंहावलोकन
**प्रा. डॉ. प्रकाश पवार, जि. नागपूर** || 93

21) स्वयंसहायता महिला बचत गट आणि महिला सक्षमीकरण
**सौ. कमल आर. पोटदुखे** || 96

22) कुमारावस्थेतील विद्यार्थ्यांसाठी योग शिक्षणाचे महत्व
**श्रीमती सोनाली भागवतसिंग राठोड, प्रा. डॉ.आनंद माधवराव वाघ, औरंगाबाद** || 100

23) विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्यासाठी शिक्षकांची भूमिका
**डॉ. उज्ज्वला के. सदावर्ते, नांदेड.** || 102

24) 'बंद दराजो का साथ' आणि 'आता कुठं जाशील टोळंभट्टा?' यांचा तौलनिक विचार
**प्रा. निलांबरी कुलकर्णी** || 104

25) शिवकालीन लष्करी नियम, शिस्त
**डॉ.सतिश प्र. ढोरे, जि. अकोला** || 107

26) संत नामदेवांच्या काव्यातील रसालंकार
**अरूण भिकाजी वाळके, वाराणसी** || 110

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

16

# संत एकनाथ: मध्यअयुगीन मराठी साहित्यिक व धर्मरक्षणकर्ता

**डॉ. चव्हाण बाळासाहेब संतू**
प्रमुख, पदवी व पदव्युत्तकर मराठी विभाग,
डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव

***********

संत एकनाथांच्या सर्व भारुडातून नाथकालीन समाजाच्या् अंतरंगाचे दर्शन होते. एकनाथांची भारुडसृष्टी प्राधान्याने तत्कालीन ग्रामजीवनाचे प्रतिनिधित्त्व करते. त्यात कृषिप्रधानता आहे. तीवर उपजीविका करणारे भिक्षेकरी किंवा तत्सम समाजघटक त्यात येतात. व्यक्तिगत स्वार्थ साधनेपलिकडे समाजहिताचा विचार न करणारा आणि धन्याच्या हितरक्षणाकडे दुर्लक्ष करणारा आत्मकेंद्रित समाजवर्गही या भारुडांतून प्रकर्षाने दिसतो. हाती असलेल्या सत्तेचा उपयोग स्वार्थासाठी करणारा माजोरी शासकवर्ग आहे. अस्मानी सुलतानीमुळे गावे उद्ध्वस्त होत आहेत. ग्रामजीवनात उद्योगप्रधानतेपेक्षा सुस्त आणि शांत वातावरणच गुरफटलेले येथील जीवन आहे. आत्मिक आणि लौकिक उन्नतीसाठी उद्यमशीलता नाही. दैवावर विसंबून राहण्याचीच प्रवृत्ती अधिक या स्थितीशील, चौतन्यहीन समाजव्यवस्थेतील व्यक्ती आणि त्यांच्या वृत्ती— प्रवृत्ती नाथांच्या भारुडातून सहजतया दिसतात. भारुड हाही लोकरंजनाचाच पण अध्यात्मिक उन्नती साधण्यास लोकांना प्रवृत्त करणारा एक वाङ्मयप्रकार आहे. एकनाथांच्यामुळे मराठी साहित्यात त्याला वैशिष्ट्यपूर्ण आणि चिरस्थायी स्थान प्राप्त झाले. सोळाव्या शतकातील समाज धार्मिक अस्थिरता, राजकीय दास्य आणि सामाजिक स्थितिशीलता व चौतन्यहीनता यांनी ग्रासलेला होता. अशा समाजास सुसंघटित करून या बहुविध लोकांना भागवतध मच्या छत्राखाली आणण्याचे महत्कार्य संत एकनाथांनी केले. एकूण भारुड रचनांना सामाजिक, अध्यात्मिक आणि वाङ्मयीन महत्त्व आहे. समाजाच्या सर्व थरांत भागवत धर्माचा प्रसार करून नेणत्यांना जाणते करणे हे संत एकनाथांचे कार्य होते. तत्सिध्यर्थ भारुडे नाथांनी रचली. एकनाथांची सुमारे ४०० भारुडे समाजातील विविध अशा १३० विषयांवर आहेत नाथांच्या भारुडात तत्कालीन समाजातील सर्व विषय समाविष्ट झाले आहेत. समाजातील भिन्न भिन्न चित्रे त्यात प्रतीत होतात. विषयाच्या ओघाने समाज, व्यक्तीस्वभाव, समाजातील व्यवसाय, उत्सव खेळ, समाजाशी जवळीक असणारे पशुपक्षी सर्वांची चित्रे स्पष्टपणे दिसून येतात. यातून लोकजीवनाचे, लोकव्यवहाराचे व लोकानुभावाचे संमीश्र दर्शन घडते. समाजातील असा एकही विषय नाही की जो भारुडांत नाही. एकूणच भारुडांतील सामाजिक, अध्यात्मिक व वाङमयीन गुणवत्ता पाहण्यासारखी आहे.

आध्यात्मिक व नैतिक शिकवण देणारे मराठीतील रूपकात्मक नाट्यगीत म्हणजेच भारूड. लौकिक व्यवहारात आध्यात्मिक व नैतिक रूपके रचण्याची परंपरा फार प्राचीन आहे. अशी रूपके महाभारतात, भागवतात तशीच लोकगीतात आणि कलगीतुऱ्याच्या शाहिरात आढळतात. ज्ञानेश्वर— नामदेवांनी रचलेली रूपके याच परंपरेतील. रूपकाच्या चमत्कृतीने श्रोत्यांचे लक्ष वेधायचे, त्या रूपकाचा उलगडा करण्यात त्यांना गुंतायचे आणि अंती त्यातील आध्यात्मिक— नैतिक आशय त्यांच्या मनात उतरावयाचा, हे कार्य अशी रूपके उत्कृष्टपणे करतात. संताच्या गौळणी, विराण्या या रचनादेखील रूपकात्मकच, परंतु ती आध्यात्मिक व नैतिक शिकवणीकरिता नसून भक्तीची आर्तता व्यक्त करण्याकरिता केलेली भारूडहून वेगळी. महालक्ष्मी, भवानी, खंडोबा, बहिरोबा इ. देवतांचे उपासक, महानुभाव, लिंगायत, नाथ इ. पंथाचे अनुयायी, आंधळा, बहिरा, पांगळा इ. भिक्षेकरी, ज्योतिषी, भटजी, जागत्या इ. व्यावसायिक, डोंबारी, कोल्हाटी, जादूगार, भाड इ. लोककलावंत, दळण, कांडण, बाजार, वृश्चिकदश इ. प्रसग, फुलवरा बांधणे, नवस करणे, हळद लावणे इ. निमित्ताने, हुतुतू, टिपरी, भोवरा, भारुडात रूपके रचलेली असतात. अशा प्रकारची रचना ज्ञानदेव नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास इ. संतांनी केलेली आढळते. तरीही एकनाथांचीच भारूडे ही अधिक

लोकप्रिय झाली. ती इतकी की भारूडे म्हटली की एकनाथांचेच नाव डोळ्यासमोर येते. भारूड ही संज्ञा बहुरूढ ते भारूड. भराडी जातीचे लोक गातात ते भारूड, भारूड अशा विविध व्युत्पत्ती सुचवल्या गेल्या आहेत. परंतु यातील कोणत्याही व्युत्पत्तीस भरीव आधार नाही. व्यवहारातील भारूडाचा अर्थ कंटाळवाणी निरर्थक बडबड असा आहे, पण तोही कसा आला कळत नाही.

बहुजनांच्या भावना ध्यानात घेऊन मुख्यतः त्यांच्यासाठी साहित्य रचणारा एक लोकसाहित्यप्रकार संत एकनाथ ह्याच हेतूने त्यांची प्रत्येक वाड्मयीन कृती प्रेरित झाली आहे. त्यांच्याइतकी प्रचंड, प्रसन्न आणि विविध ग्रंथरचना करणारा दुसरा कवी नसेल. त्यांची एकूण कविता पाऊण लाखाच्या घरात जावी. पण ही सर्व रचना समाजास काही सांगावे, शिकवावे या बुद्धीने जन्मलेली आहे. नाथकालीन समाज हा दुःखदारित्र्यांनि खचून गेलेला होता. यादवकालीन वैभवाचा मागमूसही नाथकालात दिसत नाही. जीवन्मृतावस्थेत काळ कंठणाऱ्या या स्वकालीन समाजाची काही चित्रे नाथांनी काढली असून ती अती विदारक वठली आहेत. सामाजिक सुखदुःखाविषयी आस्था बाळगणाऱ्या या संतकवीची सहानुभूती विशाल होती, पाहणे बारीक होते, समाजोद्धाराची तळमळ जिवंत होती आणि त्यांच्या अभिप्रायात एक प्रकारचा मार्मिकपणा होता. आपल्या बहुविध बहुरंगी आणि बहुछंदी समाजास एका भागवत धर्माच्या सूत्रास गोवून त्यास एकरूप करून टाकणे हे नाथांचे महत्कार्य होय. परतंत्र व म्हणून अवनत अशा महाराष्ट्राचे धार्मिक पुढारीपण निरोविले. त्यांची धर्मसेवा हीच एक प्रकारे राष्ट्रसेवा झाली व त्यासाठी भारुड (लोकसाहित्य) हे साधन त्यांनी वापरले. नाथपूर्व कवींनीही (ज्ञानेश्वर, नामदेव) भारुडे रचिली आहेत, पण भारुडे म्हटले की नाथांचेच नाव पुढे येते. कारण म्हणजे एकनाथी भारुडांची संख्या, त्याचे वैचित्र्य, व्यापकत्व, त्याचा ठसठशीतपणा, त्यातील रूपकांची, विनोदाची आणि अध्यात्मबोधाची बहार, व त्याचा सर्व समाजाच्या संख्या–तीनशेच्या तरी आसपास असावी, नाथांनी ही लोकवाड्मय लोकशिक्षणाच्या कामी योजले. समाजाचा हा तळाचा वर्ग, त्याच्या आवडीनिवडी, त्याचे रागलोभ, त्याची सुखदुःखे, ही सारी नाथांनी नीटपणे न्याहाळली असून त्यांच्याशी ते पूर्णपणे समरस झाले होते. एकनाथी भारुडांच्या यशाचे मर्म यात आहे. सर्व भारुडांमधून एकनाथांच्यास कविमनाची व्याएपक व गाढ सहानुभूती व्येक्तन होते. नाथांनी या काव्य प्रकारावर भर दिला याचे कारण म्हयणजे त्यांनना मिळालेला अवसर व त्यानच्यां मनाची पारमार्थिक अवस्थार ही असणे शक्यय आहे. नाथांच्याा जीवितहेतू भक्ती चा प्रसार हा होता व तात्सिध्दिसाठी त्यांसनी भारूड हे एक प्रभावी साधान म्हिणून वापरले. ज्ञानेश्वर नामदेवानंतर एका दृष्टिने कुचंबलेला भक्तीमार्ग पुन्हास वाढीस लागण्या साठी एकनाथांसारख्यां 'भक्त्धुरंधरा' चीच जरुरी होती. नाथ चांगले सुखरुप प्रापंचिक होते. तसेच त्याच्यान ठिकाणी विषयवैराग्यर व प्रपंच विन्मु खताही होती. या सर्व अनुकूल परिस्थितीचा उपयोग त्यांनी लोकोध्दाारासाठी करुन घेतला या कामी भारुड हे साधन विशेष उपयोगी पडले. नाथांची ही भारुडे त्योनी आपल्यास उतारवयात लिहिली असावी असे त्योतील मुरलेली अनुभववाणी पाहून वाटते. समाजाच्याा सर्व थरांत भागवत धर्माचा प्रसार करुन नेणत्यां ना जाणते करणे हे त्यांतचे जीवितकार्य असल्यामुळे तत्सिध्य र्थ ही भारुडे त्यां नी रचिली.

एकनाथांच्याह भारुडांना सामाजिकदृष्टया महत्वे आहे. भारुडातील आध्यात्मिक रुपक योजनेसाठी लौकिक व्यभवहारातील तपशील उपमान म्हतणून योजिल्यामुळे नाथकाळातील समाजाचे चित्र साकार झालेले आहे. सोळाव्याम शतकातील राजकीय आणि धार्मिक परिस्थिती, समाजातील लोक, त्योंचे जीवन, समाजात रुढ, असलेल्याम प्रथा, साजरे केले जाणारे सण, उत्साव, प्रचलित खेळ यांचे दर्शन भारुडातून घडते. समाजातील विविध गट, त्यांचे आपसातील संबंध, लोकव्यलवसाय यांची कल्पेना भारुडावरुन येते. समाजात उपयोगात येणाऱ्या विविध वस्तूही भारुडातून दृग्गोचर होता. समाजातील पीडादायक रोगांची, त्यावरील उपचारांची, मंत्रतंत्रादी विद्यांची माहिती भारुडातून मिळते. भारुडातील उल्लेखावरून त्या काळातील घरांची रचना, नगराची रचना इत्यादी वास्तुविषयक माहितीही मिळते. एवंम् अध्यात्मबोध करून देण्यास योजिलेल्या लौकिक

व्यवहारातील उपमानांच्या अनुषंगाने तत्कालीन समाजाचे यथार्थ दर्शन घडविणाऱ्या नाथांच्या भारुडांचे सामाजिक महत्त्व अनन्यसाधारण आहे. साहित्याचा कलेच्या अंगाने विचार करणारा कलावादी पक्ष आहे. तसाच जीवनाच्या कलेच्या अंगाने विचार करणारा जीवनवादी पक्ष आहे. साहित्य हा समाजजीवनाचा आरसा आहे, त्याचप्रमाणे साहित्य हा समाज जीवनाचा ऐतिहासिक दस्तऐवज आहे अशी एक विचारधारा जीवनवादात आहे. त्यादृष्टीने विचार करता नाथांच्या भारुडातील सामाजिकतेची अन्वर्थकता स्पष्ट होईल.

एकनाथांनी तत्कालीन समाजातील कर्मठ ब्राह्मणांच्या छळाला न जुमानता वेदातील कर्मकांडाचे अवास्तव महत्त्व कमी करून वेदांतातील कर्मकांडाचे अवास्तकव महत्वप कमी करुन वेदांतातील अव्द्वैत भक्तीर घेऊन अध्यालत्मेपरिपूर्ण अशा काव्यटरचना केल्याच. निम्न स्तउरातील लोकांसाठी 'अभंगात्मवक भारुडरचना करुन सर्वांभूती भागवत धर्म रुजविला. यास्त्व त्यां नी लौकिक व्य वहारातील अनेक रचना करुन सर्वांभूती भागवत धर्म रुजविला. यास्तहव त्यां नी लौकिक व्य वहारातील अनेक उदाहरणे घेतली. भागवतधर्मातील विठ्ठलभक्ती, चंद्रभागा, पंढरपूर वारी इत्याहदीचे महत्वण पटवून सांगितले. 'मीच परमेश्व्र मीच विश्वर' हा अव्दै त सिध्दां त त्यांतनी भारुडातून पटवून दिला. १) जीवनाची क्षणभंगुरता, २) संसाराची नश्व रता, ३) नरदेहाने परमार्थ साधणे, ४) निष्काम सेवेची महती, ५) सद्गुरूची महती, ६) संतसमागमाचे महत्त्व स्वत: अनुभवून परमात्मचिंतन इत्यादी आध्यात्मिक तत्त्वे बहुविध भारुडातून पटविली. त्यांनी ब्रह्म, माया, विश्वनिर्मिती या विषयीचे गूढ अध्यात्म भारुडातून स्पष्ट केले. परंतु या गूढ चर्चेच्या भानगडीत न पडता सद्गुरूची सेवा करावी, सगुण निर्गुण परमेश्वराची भक्ती करावी हेही आर्वजून सांगितले. नाथांच्या भारुडातील आध्यात्मिक तत्त्वज्ञानासंबंधी विचार केला असता असे दिसून येते की तत्त्वज्ञानात वेदातील कर्म, ज्ञान, भक्ती ही तत्त्वे घेऊन वेदांत शास्त्रातील अद्वैत भक्तीची त्यास जोड देऊन या अध्यात्म सूत्राभोवती नाथांनी आपल्या काव्यरचनाची गुंफण केली आहे. अध्यात्मातील ईश्वर, जीव, जगत, धर्म आणि तत्त्व या पांच विषयांचे विवेचन वेदांत केले आहे. या पाच विषयांचे यथार्थ ज्ञान करून देण्यासाठी महर्षीनी सहा दर्शन शास्त्रे लिहिली. १) वैशेषिक, २) वेदांत, ३) न्याय, सांख्यशास्त्र, ४) पातंजली योगशास्त्र, ५) पूर्व मीमांसा (जैमिनीचे), ६) उत्तर मीमांसाशास्त्र. या दर्शनांतील भिन्न भिन्न मार्ग जरी शेवटी परमात्मस्वरूपी एकरूप होत असले तरी संतांनी भक्तीप्रसारासाठी आपापल्या मताप्रमाणे या शास्त्रांचा अवलंब केला. नाथांनी प्रकृतीने निर्माण केलेल्या विश्वनिर्मितीचा खेळ भारुडातून सांगताना सांख्यशास्त्राचा आधार घेतला आहे तर कित्येक भारुडातून योग्यांची परिभाषाही वापरलेली आहे. तरी सर्वसामान्यास सहजपणे समजू शकेल अशा निष्काम कर्मयोग आणि वेदांतातील अद्वैत भक्तीचाच पुरस्कार केला. कर्म ब्रह्म एकरूपकता, प्रपंच परमार्थ एकरूपता, जनजनार्दन ऐक्य, ही तत्त्वे नाथांनी आपल्या भक्तीपरिपूर्ण भारुडातून सर्वाठायी रूजविली. यावरून भारुडाचे आध्यातिमक महत्त्व अनमोल आहे हे सिद्ध होते.

परमार्थ बोध करून देणे हे नाथांच्या काव्याचे प्रयोजन होते. म्हणूनच त्यांनी एवढा अफाट काव्यप्रपंच केला. या विपुल काव्यप्रपंचात सर्वसामान्यापर्यंत पोहोचण्यास भगवद्भक्तीचा प्रसार करण्यासाठी रूपकात्मक अशी भारुडरचना केली. भारुडे विविध विषयावर विपुल, बहुरंगी, बहुढंगी आहेत. भारुडांची भाषा स्वाभाविक आणि बहुजनास समजेल अशी अल्पाक्षरी, मितव्ययी आहे. मराठीबरोबरच हिंदी, कानडी, तेलंगी, उर्दू, फारसी, संस्कृत शब्दांचाही वापर भारुडात केला आहे. भारुडातील अलंकार योजनेमुळे त्यात रंजकता निर्माण झाली आहे. अध्यात्म समाजवून सांगण्यात तो सुलभतेने रूजावा म्हणून भारुडात अलंकारांची योजना केली. यमक, अनुप्रास, श्लेष यासारखे शब्दालंकार आणि उपमा, उठोक्षा, दृष्टांत, रूपक, अतिशयोक्ती, स्वभावोक्ती इत्यादी अलंकारांनी भारुडांना सजविले. भारुडात विविध अलंकारांची योजना केलेली असली तरी रूपक अलंकारांच्या योजनेत नाथांचे खास वैचित्र्य आहे. नाथांना आत्मा आणि परमात्मा यांची एकरूपता रूपकाद्वारे सहजतेने पटविता आली. संसारातील दैनंदिन व्यवहारात आणि परमार्थ विचारात अद्वितीय एकरूपता या अभेददर्शक आणि

रूपकाश्रयी रचनेने पटविणे शक्य झाले. नाथांनी या विषयानुसार अशी समर्पक योजना केलेली आहे. त्यामुळे नाथांच्या रूपक योजनेतील उपमानसृष्टीत विविधता आढळते. एकनाथांचा नातू मुक्तश्वेर हा सांग रूपक योजनेसाठी प्रसिद्ध आहे. परंतु सांग रूपकाची शैली नाथांच्या भारुडातही दिसते. अलंकार योजनेप्रमाणे नाथांच्या भारुडात प्रसंगोपात नवरसांचा परिपोष झालेला आहे. भक्तीरसाच्या पायावर नवरसांची उभारणी नाथांनी केली आहे. भारुडातील आध्यात्मिक अर्थ समजण्यास थोडा अवघड असला तरी रचनेतील विविध रसात्मकतेमुळे भारुडे चित्तवेधक उद्बोधक आणि रंजक झालेली आहेत.

नाथांच्या भारुडातील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यातील ग्रामीण वास्तवता, ग्रामीण जीवनसंदर्भाचा सर्वाधिक वापर केलेला आढळतो. अध्यात्म शिकविण्यास त्यांनी यांचा उपयोग केला. ग्रामरचना, ग्रामविस्तार, ग्रामशासन यंत्रणा, त्यातील विविध व्यक्ती, कृषिव्यवस्था, ग्रामसंस्कृती, इत्यादींचे लौकिक दर्शन नाथांनी अध्यात्माच्या अनुषंगाने घडविले. नाथांची प्रतिभा लोकाभिमुख असल्यामुळे सभोवतालच्या ग्रामीण जीवनातील सर्व स्तरीय वास्तवतेचा उपयोग त्यांनी आपल्या भारुडरचनेत केला. म्हणून प्राचीन मराठी साहित्यातील ग्रामीण जीवनावर रचना करणारे नाथ हे पहिलेच साहित्यिक होत.

लोकसाहित्यकार नाथांच्या भारुडांचा विचार केल्यास त्याची विपुलता आणि विषयातील विविधता थक्क करणारी वाटते. लोकजीवनातील इतक्या व्यक्ती— विषयांचे सूक्ष्म निरीक्षण आणि त्यांचा भारुडातील समर्पक आविष्कार नाथांची लोकजीवनाशी असणारी आत्यंतिक समरसता दर्शविणारा आहे. समाजाच्या सर्व स्तरांतील, अगदी भिक्षेकऱ्यांपर्यंतच्या व्यक्ती, पशु— पक्षी, देवता इ. त्यांच्या भारुडांच्या विषय बनल्या आहेत. त्यांमध्ये सौरी—कुंटीण यासारख्या स्त्रिया, जोगी—फकीरांसारखे साधक, पाटील कुलकर्णी—देशमुख—देशपांडे महार यासारखे ग्रामस्थ, कोल्हाटी— डोंबारी— गारूडी यासारखे रंजन करणारे लोक, आंधळा—पांगळा—मुका इ. अपंग, गाय—कुत्रा—एडका पोपट—टिटवी—विंचू इ. प्राणी, वासुदेव—वाघ्या—जंगम—बाळ संतोष इ. भिक्षेकरी, सरवदा— कैकार— पिंगळा इ. भविष्यवेत्ते, लपंडाव— पिंगा चेंडूफळी— हमामा— टिपरी— फुगडी यासारखे खेळ, महालक्ष्मी— अंबा यासारख्या देवदेवता अशा वेगवेगळ्या विषयात नाथांचे अंतःकरण समरस होते. विषयाची निवड करताना त्याचा सामाजिक स्तर लक्षात न घेता, त्या माध्यमातून लोकांपर्यंत पोचविण्याच्या अध्यात्मबोधाचा विचार नाथांच्या ठिकाणी प्रबळ होता. त्या त्या विषयांशी संबंधित वेशभूषा, भाषा, नाट्य, संगीत यांचा यथोचित अवलंब नाथांनी केला आहे. नाथकालीन समाजात या लोकसंख्या चांगल्या परिचयाच्या असल्यामुळे त्यांचे नाट्यीकरण पाहताना श्रोतृवृंद नकळत नाथांच्या आधीन होतो आणि नाथ आपला पारमार्थिक, नैतिक बोध त्याच्या तनामनात भिनवू शकतात. लोकसाहित्यकार आणि लोकशिक्षक या दोन्ही भूमिका समर्थपणे वठविणारा संत एकनाथांसारखा अन्य कोणताही कवी मध्ययुगीन मराठी साहित्यात आढळत नाही.

भारुडांशी श्रोत्याची होणारी समरसता नाथांनी केलेल्या प्रपंचचित्रणामुळे आणि आचारविचारांच्या विसंगतीतील दर्शविलेल्या विनोदामुळेही साधली जाते. नाथांच्या भारुडांच्या लोकप्रियतेचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांचा निर्दिष्य विनोद होय. उपहास किंवा उपरोध विषय बनलेल्या व्यक्तींविषयीच्या आस्थेच्या भावनेतून तो निर्माण होत असल्यामुळे त्यात सद्भाव—सहृदयता भरून राहिलेली असते. ही विसंगती शब्दयोजनेतून, व्यक्ति— दर्शनातून, संवादातून दाखविली जाते. नाट्यीकरणामुळे भारुडात अधिक रंग भरतो. त्याचा श्रोत/प्रेक्षक वर्गही मोठा असतो. म्हणूनच भारुडाला दृश्य—श्राव्य— काव्य म्हणावे लागते. एकनाथांच्या भारुडातील नैतिक आणि पारमार्थिक बोधाचे स्वरूप सर्वत्र सारखे आहे. तथापि त्या भारुडातून व्यक्त होणारे समाजजीवन विविधरंगी आणि विविधढंगी आहे. गृहस्थी जीवनातील सासू, सासरा, सून, मुलगा यांचे परस्पर संबंध, ताणतणाव त्यांत आहेत. फकीर, संन्यासी, जोगी असे दांभिक आणि समाजाची फसवणूक करणारे लोक आहेत. कोल्हाटी, डोंबारी, वैदीण, वासुदेव अशा घरोघरी पोचणाऱ्या व्यक्ती आहेत. विविध पशु—पक्ष्यांचे विषय षड्विकारादि भावनांची प्रतीक रूपे म्हणून येतात.

विटीदांडू, फुगडी, पिंगा, टिपरी यासारखे खेळ अद्वैत—भावना रूजविण्यासाठी उपयोगात येतात. आंधळा—पांगळा, बहिरा, पिसा, मुका इ. अपंग व्यक्ती सुदृढांचे अपंगत्व दर्शवितात. संवादात्मक भारुडात कुत्रा, बैल यासारखे प्राणी समानत्वाने बोलतात, तर ब्राह्मण—महार, हिंदू—तुर्क यांचे संवाद श्रोत्यांना द्वैताकडून अद्वैताकडे घेऊन जाता. तत्कालीन ग्रामव्यवस्थेत अडणीवरचे शंख बनून राहिलेले प्रतिष्ठित नाथांच्या टीकेचे, उपरोधाचे विषय बनतात आणि एक प्रकारे त्यांच्याविषयीचा समाजजीवनातील क्षोभच व्यक्त करतात. त्यामुळे तोही आपल्याच भावनांचा आविष्कार समजून श्रोते त्यांना दाद देतात. आसक्ती डसली, तर साऱ्या शरीरभर वेदना होतात. यावरचा उपाय म्हणजे तामस गुणांचा त्याग आणि सात्त्विक गुणांचा स्वीकार हा होय, त्यामुळे वेदना कमी होतात आणि परमेश्वराच्या भक्तीमुळे उरलीसुरली दु:खेही दूर होतात. वृश्चिकदंशामुळे होणाऱ्या अवस्थेचे स्वभावोक्तीपूर्ण वर्णन नाथांनी या भारुडात केले आहे.

धर्मरक्षण हे नाथांच्या रामकथेचे मध्यवर्ती सूत्र आहे. ही एका परीने समकालीन परिस्थितीची प्रतिक्रिया असून जनमानसाच्या आकांक्षा नाथांच्या रामकथेतून अभिव्यक्त झालेल्या आहेत असा निर्वाळा तत्कालीन राजकीय परिस्थितीच्या संदर्भात देता येतो. नाथांच्या कित्येक भारुडांत हे सूत्र आढळते. एकूणच भावार्थ रामायणांतून, अधर्म वाढलेला असून धर्मरक्षणार्थ भगवंताने अवतार घ्यावा असे आवाहन करण्यात आलेले आहे. संतांचे अवतारही धर्मरक्षणार्थ होत असतात ही नाथांची धारणा काही अभंगांतून व्यक्त झालेली आहे. भावार्थ रामायणातून अस्वस्थता, आर्तता, संकटांची जाणीव याची छाया आहे. प्रसंगी एक प्रकारची उग्रताही आहे आणि समाजाच्या पौरुषाला आवाहन देखील. सारांश समाजाला नवजागरणाची प्रेरणा देणारे आणि साहित्याला निराळे वळण लावणारे बाय निर्माण करणारे संत एकनाथ युगप्रवर्तक ठरतात ते या पार्श्वभूमीवर. एकनाथांनी समाजापुढे ठेवलेला रामकथेचा आदर्श एवढा प्रभावी ठरला की या ग्रंथानंतर मराठी साहित्यात रामकथापर वाङ्याची परंपरा निर्माण झाली. उदा. कृष्णदास मुद्गल (युद्धकांड), मुक्तेश्वर (संक्षेप रामायण), समर्थ रामदास (युद्धकांड व सुंदर कांड, लघुरामायण), आणि माधवस्वामी..अशी अनेक काव्ये उत्तरकाळात रचण्यात आलेली आहेत. एकनाथपूर्व काळातील प्रचलित असलेल्या कृष्णभक्तीपर साहित्याचे पुनरुज्जीवन करून नाथांनी रामभक्तीपर काव्य परंपरेचा प्रारंभ केला.

**संदर्भग्रंथ —**


१) प्राचीनमराठी वाङ्.मयाचा इतिहास — डॉ. ल.रा.नसिराबादकर

२) साहित्यम व संस्कृाती — दु.का.संत

३) आधुनिक मराठी वाङ्.मयाची — गो.म. कुलकर्णी सांस्कृतिक पार्श्व भूमी

४) मध्यकयुगीन मराठी साहित्यक एक पुनर्विचार — श्रीधर रंगनाथ कुलकर्णी

५) मराठी संत मंडळांचे ऐतिहासिक कार्य — बा.र.सुंठणकर


❑❑❑